


ISSN 2249-894X Impact Factor : 3.1402 (UIF) Volume - 5 | Issue - 4 | Jan - 2016





ज्प्रगती बी. मारकवार



# लोकमान्य टिळकांच्या अग्रलेखाचा चिकित्सक अभ्यास

ज प्रगती बी. मारकवार
सहाय्यज प्राध्यापज इतिहास विभाग एल.व्ही.एच.कॉलेज, पंचवटी, नाशिक

***प्रस्तावना*** :

लोकमान्य टिळक हे बहु आयामी व्यक्तिमत्व होते. विविध विषयांची जाण आणि सखोल ज्ञान असलेला सार्वजनिक जीवनात चतुरस्त्र कामगिरी बजावणारा बौद्धिक, सामाजिक व राजकीय जीवनात त्यांनी स्वतंत्र इतिहास निर्माण केला. शिक्षण, राजकारज, जज़ोल व ज्योतिषशास्त्र, गणित, संस्कृत, भ्ंारतीय व पाश्चात्य तत्त्वज्ञान, समाजकारण आणि राजकारण या सर्वच क्षेत्रात टिळक अग्रेसर राहिले. त्यांच्या जीवनातील या विविध पैलूंवर वेगवेगळया क्षेत्रातील अधिकारी व्यक्तींनी भाष्य केले आहेच, पण टिळकांची मोठी कामगिरी पत्रकारितेच्या क्षेत्रातच आहे. नव्या भारतीय पत्रकारितेचा पाया त्यांनी घातला. भारतीय भाषांतील पत्रकारितेची मजबूत इमारत आज उभी आहे, ती याच पायावर.

लोकमान्य टिळक सार्वजनिक जीवनातील विविध आघाडयांवर एकाच वेळी लढत होते. अशा वेळी त्यांना पत्रकारितेची पूर्णवेळ काम करण्याइतका अवधी मिळणे कठीणच होते. तशाही परिस्थितीत त्यांनी मराठी पत्रकारितेवर आपली कायमची छाप निर्माण केली. याचे महत्त्वाचे कारण त्यांचे प्रखर आणि विचारप्रवर्तक 'अग्रलेख' आमच्या पत्रकारितेत वाचकांना वृत्तपत्रात अनेक विषय आणि सदरे वाचायला मिळतात. त्यामुळे अग्रलेख वाचकांचा समूह बराच कमी झाला आहे. पण एकोणिसाव्या शतकाच्या उत्तर कालखंडात मराठी वृत्तपत्रात अग्रलेख हे सर्वात महत्त्वाचे सदर असे. समाजसुधारणा आणि स्वातंत्र्यलढा या दोन्हीमध्ये अग्रलेखांचा तिखट आणि धारदार आयुध म्हणून वापर झाला. हे शस्त्र लोकमान्यांनी कमालीच्या शिताफीने वापरले. त्यामुळेच त्यांचे अग्रलेख हा समस्त पत्रकार समाजाचा कायमचा श्रद्धेचा आणि स्फूर्तिचा विषय बनले.

टिळकांनी १८८१ मध्ये 'केसरी' ची स्थापना केली. तेव्हा ते वयाच्या पंचविशीत आणि शिक्षकी पेशात होते. स्वातंत्र्याबद्दलची उर्मी मराठी जनतेत निर्माण व्हावी, या उद्देशाने टिळक आणि आगरकर यांनी 'केसरी' सुरू केल्याने त्यांच्या विचारांना निश्चित दिशा आणि शब्दांना धार होती. सुरूवातीच्या काळात आगरकरांकडे 'केसरी'चे संपादकपद आणि टिळकांकडे 'मराठा' या इंग्रजी नियतकालिकाची संपादजीय जबाबदारी होती. तरीही टिळकांचे अग्रलेख या काळातही 'केसरी'त प्रसिद्ध होत होतेच. पण पुढे टिळक आणि आगरकर यांच्यात तात्विक मतभेद झाले आणि टिळकांनी कर्जासह 'केसरी'चे संपादज पद स्वतःकडे घेतले. तेव्हापासून त्यांच्या मृत्युपर्यंत टिळकांचे अग्रलेख हाच 'केसरी'चा आत्मा होता. १८८१ ते १९२० या चाळीस वर्षाच्या काळात टिळकांनी ५१३ अग्रलेख लिहिले अशी नोंद आहे. ते सुरूवातीला साप्ताहिक होते. हे गृहित धरले तरी या काळात ५१३ अग्रलेख हे प्रमाण काही कमी नाही. या सर्व अग्रलेखांनी मराठी समाजातच नव्हे, ततर समस्त भारतात विचारांच्या लाटा निर्माण केल्या. त्याची वारंवार दखल ब्रिटिश कार्यकर्त्यांना घ्यावी लागली आणि पुढे तर टिळक पुढील अंकात काय लिहित आहेत याकडे वाचकांबरोबरच ब्रिटिश राज्यकर्तेही लक्ष ठेवू लागले. लोकमान्यांनी 'केसरी'चे संपादन सुरू केले, त्याआधी व नंतरही ते सार्वजनिक जीवनात आघाडीला राहून काम करीत होते. राष्ट्रीय सभा, होमरूल, काँग्रेस अशा अनेक चळवळीत ते होते. सार्वजनिक गणेशोत्सव व शिवजयंती साजरी करण्यात त्यांचा पुढाकार होता. या आणि अशा अनेक कामांमुळे ते प्रवासात असत. मंडालेच्या

शिक्षेमुळे त्यांच्या अग्रलेख लिखानात खंड पडलाच, शिवाय पुढे त्यांनी स्वराज्य आंदोलनात स्वत:ला असे ज़ाही झोज़ून दिले, ज़ी ज़ेवळ मृत्युमुळेच ते थांबले. त्यामुळे अग्रलेख लिखानाचे काम पुढे कृष्णाजी प्रभाकर, खाडीलकर, नरहरी चिंतामण, केळकर आदिंनी केले. मात्र या लिखाणाच्या विचारांवर टिळकांचा प्रभाव होता.

लोकशाहीचा चौथा खांब वृत्तपत्राला समजले जाते. संसद, प्रशासन आणि न्यायदान संस्था या तिन्ही खांबापेक्षा वृत्तपत्राचा चौथा जांब हा अधिक मजबूत आणि प्रभावी असणे गरजेचे असते आणि ते प्रत्यक्षात दिसायलाही पाहिजे. माहिती देणे, लोक शिक्षण करणे, मनोरंजन करणे या बरोबरच लोकमत बनविणे, अन्यायाला वाचा फोडणे लोकांची गाऱ्हाणी मांडणे, लोकांचे प्रश्न सोडविण्यासाठी त्यांना सोबत घेणे ही वृत्तपत्रांची महत्त्वाची जबाबदारी मानली जाते यासाठीच पत्रकारितेत अग्रलेखाला महत्त्वाचे स्थान दिलेले आहे. टिळकांचे शब्दावर प्रभुत्व होते आणि 'केसरी' च्या प्रभावाची जाण त्यांना होती. त्यामुळेच अग्रलेखातील त्यांची शब्दांची पेरणी विषयाला आणि विचारांना पुढे नेणारी अशीच होती. निर्भीड वृत्ती व तेजस्वी बाणा हे लोकमान्यांच्या अग्रलेखांचे व्यवच्छेदक लक्षण मानायला हवे. आपल्या लिखानात स्वत:वर व 'ज़ेसरी'वर ज़ाय विपरीत परिणाम होईल याची काळजी त्यांनी कधीच केली नाही. त्यामुळेच ब्रिटीश राज्यकर्त्यांपासून समाजातील पुराणमतवाद्यांपर्यंत सर्वांना त्यांनी आपल्या लेखनीच्या फटक्यांनी चांगलेच रक्तबंबाळ केले. लॉर्ड ज़र्झन अत्यंत कठोर प्रशासक होते. त्यांच्या शिक्षणविषयक धोरणावर खडतर टिका करतांना लोकमान्यांनी 'हे आमचे गुरू नव्हेच' या शीर्षकाचा अग्रलेख लिहीला. इंग्रजी शिक्षण पद्धतीवर चौफेर टीका करण्यात टिळक अग्रेसर होते. इंग्रजी शिक्षणाच्या दुष्परिणामांबद्दल त्यांनी केलेले विवेचन आजही आपल्याला लाजू पडते. टिळक म्हणतात की, "इंग्रज सरकार देत असलेले शिक्षण पारतंत्र्यच मजबूत करणारे आहे". असे प्रतिपादन त्यांनी जोरदारपणे केले आणि शेळपट शिक्षण घेवूच नका, असे आवाहनही त्यांनी भारतीय जनतेस केले. या इंग्रजी शिक्षणाचा परिणाम काय होईल हे विशद करतांना ते लिहितात की 'शिक्षण म्हणजे एक प्रकारची चाकरी करून भाकरी मिळविण्याचा धंदा झाला आहे, हे शिक्षण नव्हे, तर ती एक प्रकारची हमालीच आहे व त्यापासून राष्ट्राचा उत्कर्ष न होता उलट अवनती होण्याचा संभव आहे. किंबहुना झालीही आहे'.

इंग्रजी शिक्षण पद्धतीवर टीका करतांनाच इंग्रजी शिक्षणाचे फायदे सुद्धा ते वाचकांसमोर आणतात. 'इंग्रजी इतिहास, इंग्रजी शास्त्रे, इंग्रजी राज्यपद्धत, इंग्रजी वाङ्मय' यांची हिंदुस्थानातील लोकांस एकदा ओळख झाली म्हणजे माणसाच्या रक्तास चावलेल्या वाघाप्रमाणे हिंदी लोक स्वातंत्र्याचे, स्वतंत्र संस्थांचे आणि सांपत्तिक वैभवाचे भोक्ते बनतील व तसे झाले म्हणजे स्वार्थाकरिता हिंदुस्थानात आलेल्या इंग्रजी लोकांच्या साम्राज्यास धक्का बसेल'. असेही भाकीत त्यांनी वर्तविले.

बंदुकीतून गोळी सुटावी असे टिळकांचे शब्द आपल्या लक्षाचा अचूक वेध घेणारे होते. त्यांचे अग्रलेख तत्कालीन विषयांवर असतात. आणि त्यामुळे त्यात असलेली मते त्याकाळापुरतीच ग्राह्य किंवा वैध असतात असा जो समज आहे त्याला टिळकांचे लिखान मात्र अपवाद होते.

भारतातील मुसलमानांनी भारतीय राष्ट्रवादाच्या दृष्टीने कोणता दृष्टीकोन बाळगावा, याविषयी टिळकांनी, 'केसरी'च्या अग्रलेखात १ ऑगस्ट १८९९ रोजी केलेले विवेचन फारच दूरदर्शी होते हे आपल्याला दिसून येते. ते म्हणतात हिंदुस्थानातील मुसलमान लोक अरबस्थानातून किंवा मध्य एशियामधून इकडे आलेल्या मुसलमानांचे वंशात असोत कसेही असले तरी हिंदुस्थान ही आता सर्वांचीच सारखीच जन्मभूमी झ ालेली आहे. व या जन्मभूमीच्या भाग्योदयासाठी सर्वांनी एकसारखीच खटपट केली पाहिजे'. हा सिद्धांत मांडत असतांनाच अल्पसंख्याकास सरकारी नोकऱ्यात पुरेसे प्रतिनिधित्व मिळावे यासाठीही त्यांनी आपली लेखणीचा उपयोग केला. १९०६ मध्ये मोर्ले मिंटो यांना भेटून आल्यावर त्यांनी लिहिले की, 'इंग्रजी सरकार हे परकी सरकार आहे आणि त्यास हिंदुस्थानावर जे राज्य करावयाचे आहे, ते मुसलमानास हाताश धरून. हिंदूवर करावयाचे नाही किंवा हिंदूस हाती धरून मुसलमानांवर करावयाचे नाही'.

'केसरी'तील अग्रलेखातून टिळकांनी भारताच्या आर्थिक दारिद्र्याची कहाणी विशद केली, शेतकऱ्यांच्या समस्यांना वाचा फोडली, इंग्रजांची व्यापार नीती हा भारताच्या फुटीचा मार्ग आहे, असे त्यांनी म्हटले आणि ही विवेचने करतांना लोकयुगाचा तत्वविचार जनतेसमोर आणला 'लोक' आणि 'लोकमत' हे टिळकांच्या राजकीय आणि सामाजिक संकल्पनांचे सार होते. तो विचार त्यांनी वारंवार मांडला. १८९७ मध्ये लोकमान्यांवर आक्षेपार्ह लिखाणाच्या आरोपावरून खटला झाला व त्यांना शिक्षा भोगावी लागली. त्यांनी 'पुनश्चः हरि ओम' या शीर्षकाचा अग्रलेख लिहिला, त्यात त्यांनी लोकमतची कल्पना पुन्हा प्रकाशात आणली. ते म्हणतात, 'कायद्याची सीमा किती असते हे न्यायालयाकडून ठरविणे हा आपला मार्ग आहे व आहे त्याचाच पुरेपूर फायदा घेवून लोकमत प्रतिबिंबीत करणे हेच आपले धोरण राहील'. टिळकांनी कारावासाची शिक्षा भोगून आल्यानंतर पहिल्याच लेखात असा इशारा ब्रिटीश सरकारला देणे हे धाडसाचे होते. ते टिळकांच्या व्यक्तिमत्वात ओतप्रेत भरलेले होते.

टिळकांची भाषा जशी सरळ आणि टोकदार, तशी त्यांच्या अग्रलेखाची शीर्षकेही तितकीच तिक्ष्ण होती. 'सरकारचे डोके ठिकाणावर आहे काय', हे शीर्षक तर आजही गाजते आणि लागूही पडते. 'उजाडले पण सूर्य कोठे आहे' 'टिळक सुटले पुढे काय', 'प्रिन्सिपॉल, शिशुपाल की पशुपाल', 'टोणग्याचे आचळ', 'बादशाह ब्राह्मण झाले' हे आणि असे अनेक मथळे त्यांच्या अग्रलेखाइतकेच गाजत राहिले.

**सारांश :**

लोकमान्यांच्या अग्रलेखांचा विस्तृत अभ्यास करावयाचा तर त्यासाठी दिवसेंदिवस बोल राहावे लागेल. इतके मात्र खरे की विचार शब्दांच्या माध्यमातून वाचकांच्या हृदयापर्यंत कसा पोहोचवायचा याचा आदर्श वस्तुपाठ टिळकांनी आपल्या अग्रलेखातून घालून दिला. टिळकांच्या निधनानंतर ८५ वर्षाच्या काळात पत्रकारितेची उद्दिष्ट्ये व संदर्भ बदलले, तरी टिळकांच्या अग्रलेखांचे महत्त्व मात्र कायम राहिल

असेच आहे. त्यांचे सूत्र टिळकांनीच १९ फेब्रुवारी १९२० रोजी 'केसरी'चे सिंहावलोकन करतांना उघड केले. ते म्हणताात, 'लेखनीच्या टोकाने व महिपात्राच्या सहाय्याने पांढज्यावर नुसते काळे करण्याचा आमचा इरादा नाही आमच्या लेखांचा अशा प्रकारचा परिणाम होण्यास आवश्यक अशी जी भाषा तीच आम्ही वापरीत असतो. अशा प्रकारचे लेख सरकारी अधिकाज्यास 'प्रिय' होत नाहीत, हे आम्हास माहित आहे. किंबहूना दुसज्या काही कारणाने वातावरण क्षुब्ध झाले असता वड्याचे तेल वांग्यावर या न्यायाने अशा प्रकारचे लेख लिहिणाज्यास अधिकाज्यांच्या अवकृपेची फळे भोगावी लागतात, याचाही आम्हास अनुभव आहे, पण त्यामुळे आमचे कर्तव्य करण्यात आम्ही कधीही मागेपुढे होणार नाही.

बंदुकीतून गोळी सुटावी असे टिळकांचे शब्द सुटत आणि आपल्या लक्षाचा अचूक वेध घेत त्यांचे अग्रलेख तत्कालीन विषयांवर असतात आणि त्यामुळे त्यात व्यक्त झालेली मतेही त्या काळापुरतीच ग्राह्य व वैध असतात असा जो समज आहे त्याला टिळकांचे लिखान मात्र अपवाद होते त्यांनी एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस विसाच्या शतकाच्या सुरूवातीस व्यक्त केलेली मते आणि सिद्धांत आजही जसेच्या तसे लागू पडतात. टिळकांची बौद्धिक बैठक किती पक्की होती व ते किती दूरवरचा विचार करत, यांचे दर्शन त्यांच्या अग्रलेखातून होते.

"लोकमान्यांच्या अग्रलेख लिखाणाचे हेच सार आहे"

## संदर्भ सूची

१) शहा, जी.बी., भामरे, आर.पी. आणि पवार, एम.डी., आधुनिक भारताचा इतिहास, प्रशांत पब्लिकेशन, जळजांव, प्रथमावृत्ती २०१४, पृ.१३४

२) जोशी, विनायक, कृष्णा आणि लेले, रामचंद्र केशव, वृत्तपत्रांचा इतिहास (खंड-१), युगवाणी प्रकाशन, मुंबई १९५१, पृ.११.

३) कर्वे, स्वाती सुहास (संपादक), 'सकाळ वृत्तपत्र आणि वृत्तपत्र समूह', राज्य मराठी विकास संस्था, महानगरपालिका मार्ग मुंबई, प्रथमावृत्ती. जाने.२००२, द्वितीय आवृत्ती, पृ.२.

४) लेले, रा.के., मराठी वृत्तपत्राचा इतिहास, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे १९८४, पृ.१७.

५) कर्वे, स्वाती सुहास (संपा), पूर्वोक्त, पृ.५